प्रकरण - 2

अध्याय – 1

# संस्थेची कार्ये व कर्तव्य यांचा तपशील

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या**
**कलम 4 (1) (ब) अन्वये 17 नियमावलींचे वर्णन खालीलप्रमाणे**

## खाते - संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प)

**4(1)(b)(i)**

मुंबई मनपा अधिनियम 1888 च्या कलम 54 (अ) अन्वये संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) यांची नियुक्ती केली जाते. अद्ययावत सुधारीत मनपा अधिनियम 1888 च्या कलम 56 (अ) आणि 56 ब (1) च्या परंतुकान्वये नगर अभियंता व प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) या खात्यांचे व विभागांचे प्रशासन आणि अद्ययावत सुधारीत मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 च्या निरनिराळया प्रकरणात असलेल्या विविध तरतूदीखाली नमूद केलेले आयुक्तांचे सर्व अधिकार आणि कर्तव्ये महानगरपालिका आयुक्तांच्या सर्वसाधारण नियंत्रणासापेक्ष संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) यांचेकडे प्रतिनियुक्त केले आहेत.

त्याअनुषंगाने नगर अभियंता व प्रमुख अभियंता (इमारत परिरक्षण) विभागाद्वारे प्राप्त होणा-या प्रस्तावासंदर्भात योग्य ते निर्देश देणे वा मंजुरी देणे. तसेच अतिरिक्त आयुक्त व महानगरपालिका आयुक्त यांच्या कार्यकक्षेतील प्रस्ताव शिफारसीसह मा. अतिरिक्त आयुक्त व मा. महानगरपालिका आयुक्त यांच्या मान्यतेकरीता सादर करणे. मा. अतिरिक्त आयुक्त व मा. महापालिका आयुक्त यांच्या आदेशान्वये विविध समित्या / चौकशी साठी नेमणूक झाल्यास त्याबाबतचे कामकाज पाहणे इ. कर्तव्ये पार पाडली जातात.